तरुण भारत ४
रविवार, ३ नोव्हेंबर २०१९

## केसांच्या तक्रारीसंबंधी आज मोफत शिबिर

बेळगाव : केएलई आयुर्वेदिक हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, शहापूर येथे रविवार दि. ३ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत केसांच्या तक्रारींवर मोफत सल्ला शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात कोल्हापूरचे वैद्य डॉ. शिवानंद पाटील केस गळती, केसात कोंडा होणे, पांढरे केस यावर तपासणी करून सल्ला देतील. इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे कळविण्यात आले आहे.

बुधवार १३ नोव्हेंबर २०१९
तरुण भारत पान ५

## केएलई आयुर्वेदिक हॉस्पिटलतर्फे १५ रोजी थायरॉईड चिकित्सा शिबिर

बेळगाव : केएलई आयुर्वेदिक हॉस्पिटल व मेडिकल रिसर्च सेंटरतर्फे दि. १५ रोजी सकाळी ९ ते १ व दुपारी ३ ते ५ यावेळेत थायरॉईड चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तसेच दि. १६ रोजी सकाळी ९ ते १ व दुपारी ३ ते ५ यावेळेत प्रि डायबेटिक तपासणी शिबिर होणार आहे. उच्च रक्तदाब, मधुमेहाची आनुवंशिकता, गर्भारपणी होणारा मधुमेह, स्थूलत्व असणाऱ्या १८ ते ६० वयोगटातील सर्वांसाठी हे शिबिर खुले आहे, असे कळविण्यात आले आहे.

सकाळ
शुक्रवार, १५ नोव्हेंबर २०१९

## केएलई आयुर्वेदतर्फे उद्या शिबिर

बेळगाव : शहापूर येथील केएलई आयुर्वेद हॉस्पिटलतर्फे शनिवारी (ता. १६) दुपारी ४ वाजता स्थूलत्व निवारण शिबिर होणार आहे. औरंगाबाद येथील जीवनरेखा फौंडेशनचे डॉ. मुकुंद सबनीस व सहकारी तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत. गरजूंनी लाभ घ्यावा, असे कळविले आहे.

तरुण भारत १३
गुरुवार १४ नोव्हेंबर २०१९

## केएलई आयुर्वेद हॉस्पिटलतर्फे १६ रोजी स्थूलत्व निवारण शिबिर

बेळगाव : केएलई आयुर्वेद हॉस्पिटल शहापूरतर्फे स्थूलत्व निवारण शिबिर दि. १६ रोजी दुपारी ४ वा. आयोजित केले आहे. औरंगाबाद येथील जीवनरेखा फौंडेशनचे डॉ. मुकुंद सबनीस आणि सहकारी यांच्या सहकार्याने हे शिबिर होत आहे. शिबिरार्थींची तपासणी केली जाईल. शिवाय औषधांवर सवलत दिली जाईल, असे कळविले आहे.

सकाळ
गुरुवार, १४ नोव्हेंबर २०१९

## केएलईतर्फे उद्या थायरॉईड चिकित्सा

बेळगाव : केएलई आयुर्वेद हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरतर्फे शुक्रवारी (ता. १५) थॉयराईड चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शहापूरमधील आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये सकाळी ९ ते दुपारी १ व दुपारी ३ ते सायंकाळी ५ पर्यंत शिबिर होणार असल्याचे कळविले आहे.

तरुण भारत ४
रविवार, १७ नोव्हेंबर २०१९

## आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये मूळव्याध निवारण शिबिर

बेळगाव : केएलई आयुर्वेदिक हॉस्पिटल शहापूर येथे दि. १८ व २३ नोव्हेंबर रोजी मूळव्याध तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ९ ते १ व दुपारी ३ ते ५ या वेळेत हे शिबिर होणार आहे. शस्त्रचिकित्सेविना आयुर्वेदिक पद्धतीने उपचार करण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

ವಿಜಯ ಕರ್ನಾಟಕ
ಬುಧವಾರ, 13 ನವೆಂಬರ್ 2019

### ಕೆಎಲ್‌ಇ ಇಂಜಿನಿಯರಿಂಗ್ ಕಾಲೇಜು, ಕಂಕಣವಾಡಿ ಆಸ್ಪತ್ರೆ ಸಹಯೋಗದಲ್ಲಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿದ ಯಂತ್ರ

# ವಾಮ ಸಂಸಾಧನಕ್ಕೆ 25 ಲಕ್ಷ ಪ್ರೋತ್ಸಾಹ ಧನ

■ **ವಿಕ ಸುದ್ದಿಲೋಕ** ಬೆಳಗಾವಿ

ಕೆಎಲ್‌ಇ ಸಂಸ್ಥೆಯ ಡಾ. ಎಂ.ಎಸ್.ಶೇಷಗಿರಿ ಅಭಿಯಾಂತ್ರಿಕ ಮತ್ತು ತಾಂತ್ರಿಕ ಮಹಾವಿದ್ಯಾಲ ಯದ ಇಲೆಕ್ಟ್ರಾನಿಕ್ಸ್ ಆ್ಯಂಡ್ ಕಮ್ಯುನಿಕೇಷನ್ ಎಂಜಿನಿಯರಿಂಗ್ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಸಿದ್ಧಪಡಿಸಿದ 'ವಾಮ ಸಂಸಾಧನ' ಪ್ರೊಜೆಕ್ಟ್‌ಗೆ ರಾಷ್ಟ್ರ ಮಟ್ಟದ ಪ್ರಶಸ್ತಿಯೊಂದಿಗೆ 25 ಲಕ್ಷ ರೂ. ಪ್ರೋತ್ಸಾಹ ಧನ ಲಭಿಸಿದೆ ಎಂದು ಪ್ರಾಚಾರ್ಯ ಡಾ. ಬಸವರಾಜ ಕಟಗೇರಿ ತಿಳಿಸಿದರು.

ಮಂಗಳವಾರ ಸುದ್ದಿಗೋಷ್ಠಿಯಲ್ಲಿ ಅವರು ಈ ಕುರಿತು ಮಾಹಿತಿ ನೀಡಿದರು.

ಬೆಂಗಳೂರಿನಲ್ಲಿ ಈಚೆಗೆ ಕೇಂದ್ರ ಸರಕಾರದ ವಿಜ್ಞಾನ ಮತ್ತು ತಂತ್ರಜ್ಞಾನ ಮಂತ್ರಾಲಯದ ವತಿಯಿಂದ ಇಂಡಿಯಾ ಇನ್ನೋವೇಷನ್ ಚಾಲೆಂಜ್ ಡಿಸೈನ್ ಸ್ಪರ್ಧೆ ನಡೆದಿತ್ತು. ಸ್ಪರ್ಧೆಯಲ್ಲಿ ದೇಶದ 1,760 ಎಂಜಿನಿಯರಿಂಗ್ ಕಾಲೇಜುಗಳು 26,511 ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಭಾಗವಹಿಸಿದ್ದರು. ಅದರಲ್ಲಿ ಕೆಎಲ್‌ಇ ಕಾಲೇಜಿನ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ನಗರದ ಬಿ.ಎಂ. ಕಂಕಣವಾಡಿ ಆಸ್ಪತ್ರೆಯ ಸಹಯೋಗದಲ್ಲಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿದ ವಾಮ ಸಂಸಾಧನ ಪ್ರೊಜೆಕ್ಟ್ ಪ್ರಶಸ್ತಿ ಸಿಕ್ಕಿದೆ ಎಂದರು.

ಕೆಎಲ್‌ಇ ಸಂಸ್ಥೆಯ ಶೇಷಗಿರಿ ಮಹಾ ವಿದ್ಯಾಲಯ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರಾದ ಡಾ. ರಾಜಶ್ರೀ ಕನಯ್, ಡಾ. ಶೀಲಾ ಕೋರೆ ಹಾಗೂ ಆಯುರ್ವೇದ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯದ ಡಾ. ಅನಿಲ್ ಕೋರಳ್ಳಿ ಅವರ ಮಾರ್ಗದರ್ಶನದಲ್ಲಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಾದ ಸ್ವಾತಿ ಪೈ, ಪ್ರಿಯಾ ಶಿರಹಟ್ಟಿ, ಜೀವನ್ ಪತಂಗೆ ಸಂತೋಷ ಹಿರೇಮಠ ಅವರು ವಾಮ ಸಂಸಾಧನ ಪ್ರೊಜೆಕ್ಟ್ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿದ್ದಾರೆ ಎಂದರು. ಸುದ್ದಿಗೋಷ್ಠಿಯಲ್ಲಿ ಆಯುರ್ವೇದಿಕ್ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯದ ಪ್ರಾಚಾರ್ಯ ಡಾ. ಬಿ.ಎಸ್.ಪ್ರಸಾದ ಮತ್ತಿತರರು ಉಪಸ್ಥಿತರಿದ್ದರು.



ಬೆಳಗಾವಿಯ ಕೆಎಲ್‌ಇ ಸಂಸ್ಥೆಯ ಕಾಲೇಜಿನ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಸಿದ್ಧಪಡಿಸಿದ ವಾಮ ಸಂಸಾಧನ ಯಂತ್ರದೊಂದಿಗೆ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಹಾಗೂ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು.

> ಮುಂದಿನ 6 ತಿಂಗಳಲ್ಲಿ ವಾಮ ಸಂಸಾಧನ ಯಂತ್ರವನ್ನು ಇನ್ನಷ್ಟು ಅಭಿವೃದ್ಧಿಪಡಿಸಿ ಮಾರುಕಟ್ಟೆಗೆ ಬಿಡುಗಡೆ ಮಾಡಲಾಗುವುದು. ಈಗ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿದ ಯಂತ್ರಕ್ಕೆ 18 ಸಾವಿರ ರೂ. ವೆಚ್ಚವಾಗಿದೆ. ಈ ಯಂತ್ರವನ್ನು ಆಯುರ್ವೇದಿಕ್ ಆಸ್ಪತ್ರೆ ಸೇರಿದಂತೆ ಇತರೆ ಆಸ್ಪತ್ರೆಗಳಲ್ಲೂ ಬಳಕೆ ಮಾಡಬಹುದು.
>
> **- ಬಸವರಾಜ ಕಟಗೇರಿ,** ಪ್ರಾಚಾರ್ಯ

**ಏನಿದು ಪ್ರೊಜೆಕ್ಟ್?:** ವಾಮನ ಕರ್ಮ ಸಿದ್ಧಾಂತ ಪುರಾತನ ಆಯುರ್ವೇದಿಕ ಪದ್ಧತಿ. ಈ ಪದ್ಧತಿ ಮೂಲಕ ರೋಗಿಯ ವಾಂತಿಯನ್ನು ಪರೀಕ್ಷೆಗೊಳ ಪಡಿಸಿ, ಆರೋಗ್ಯದ ಸಂಪೂರ್ಣ ಮಾಹಿತಿ ನೀಡಲು ಸಾಧ್ಯ. ಇದರಿಂದ ಸಮಯದ ಉಳಿತಾಯ ಮತ್ತು ರೋಗಿಗಳಿಗೆ ತುರ್ತು ಚಿಕಿತ್ಸೆ ನೀಡಲು ಸಹಾಯವಾಗುತ್ತದೆ ಎಂದು ಡಾ. ಬಸವರಾಜ ಕಟಗೇರಿ ತಿಳಿಸಿದರು.

सकाळ
बेळगाव, सोमवार, १८ नोव्हेंबर २०१९ ४

# केएलई आयुर्वेदतर्फे आजपासून शिबिर

**बेळगाव :** शहापूर येथील केएलई आयुर्वेद हॉस्पिटलतर्फे मूळव्याध चिकित्सा शिबिराचे १८ ते २३ नोव्हेंबरपर्यंत आयोजन केले आहे. सकाळी ९ ते दुपारी १ व दुपारी ३ ते सायंकाळी ५ पर्यंत शिबिर होणार आहे. गरजूंनी लाभ घ्यावा, असे कळविले आहे.

सकाळ
शुक्रवार, २२ नोव्हेंबर २०१९ / ३

# विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावा

## डॉ. अलका काळे; कंकणवाडी आयुर्वेदिक महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन

शहापूर, ता. २१ : विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच इतर विविध विषयांवरची चांगली पुस्तके वाचण्याचा छंद लावून घ्यावा. वाचनामुळेच आपल्याला अधिक ज्ञानप्राप्ती होते. सदैव वाचनाची आवड जोपासण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन केएलई व्ही. के. कत्ती दंत वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अलका काळे यांनी केले.

शहापूरमधील बी. एम. कंकणवाडी आयुर्वेदिक महाविद्यालयात केंद्र ग्रंथालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ग्रंथालय सप्ताहानिमित्त आयोजित तीन दिवसीय पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन बुधवारी (ता. २०) झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. बी. श्रीनिवास प्रसाद अध्यक्षस्थानी होते.

डॉ. प्रसाद यांनी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांनी आपला अमूल्य वेळ वाया न घालता अधिक वेळ ग्रंथालयात ग्रंथांचे वाचन करण्यात घालवावा, असा सल्ला दिला. आयुर्वेदावरची अनेक महत्त्वपूर्ण पुस्तके असल्याचा उल्लेख करून पुस्तके, संदर्भ ग्रंथ कसे वाचावेत, यांचे तंत्र आत्मसात करा, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. डॉ. महांतेश रामण्णावर यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी. डी. जाडर, डॉ. प्रसन्ना सावनूर, ग्रंथपाल शशिकांत पाटील, परदेशी विद्यार्थी अन्ना तबियन आदींसह बीएएमएस अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. संजीव टोन्नी यांनी आभार मानले.




**बेळगाव : पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. अलका काळे, डॉ. बी. श्रीनिवास प्रसाद, डॉ. महांतेश रामण्णावर, डॉ. संजीव टोन्नी, डॉ. पी. जी. जाडर, डॉ. प्रसन्ना सावनूर, शशिकांत पाटील आदी.**

तरुण भारत ५
शुक्रवार २२ नोव्हेंबर २०१९

# कंकणवाडी आयुर्वेदिक महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन

प्रतिनिधी / बेळगाव

काहेरसच्या बी. एम. कंकणवाडी आयुर्वेदिक महाविद्यालय, मध्यवर्ती ग्रंथालय व एनएसएस युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने पुस्तकांचे प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अलका काळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड बाळगावी. सतत वाचन केल्याने मनुष्याचे ज्ञान वाढण्याबरोबरच इतर गोष्टींची माहिती मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन करणे गरजेचे आहे. तसेच शैक्षणिक पुस्तके वाचण्यावर अधिक भर दिला पाहिजे, डॉ. अलका काळे म्हणाल्या.

यावेळी डॉ. बी. श्रीनिवास प्रसाद यांनी विद्यार्थ्यांनी बहुमूल्य वेळ इतरत्र वाया न घालता ग्रंथालयात चांगली पुस्तके वाचण्यात खर्च करावा, असे आवाहन केले. सूत्रसंचालन एनएसएस अधिकारी डॉ. संजीव टोन्नी व डॉ. महांतेश रामण्णावर यांनी केले. प्रा. रचना यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तसेच आभार मानले.

कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. पी. जी. जादर, डॉ. प्रसन्न सावनूर, शशिकांत पाटील, ग्रंथालय सहकारीवर्ग व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

ವಿಜಯ ಕರ್ನಾಟಕ
ಶುಕ್ರವಾರ, 22 ನವೆಂಬರ್ 2019 III

# ಪುಸ್ತಕ ಓದುವ ಹವ್ಯಾಸ ಬೆಳೆಸಿಕೊಳ್ಳಿ

**ವಿಕ ಸುದ್ದಿಲೋಕ** ಬೆಳಗಾವಿ

ನಗರದ ಕೆಎಲ್‌ಇ ಸಂಸ್ಥೆಯ ಬಿ.ಎಂ. ಕಂಕಣವಾಡಿ ಆಯುರ್ವೇದ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯದಲ್ಲಿ ಕೇಂದ್ರ ಗ್ರಂಥಾಲಯ ಹಾಗೂ ಎನ್‌ಸ್‌ಎಸ್ ಘಟಕ ಸಹಯೋಗದಲ್ಲಿ ಹಮ್ಮಿಕೊಂಡಿರುವ ಎರಡು ದಿನಗಳ ಪುಸ್ತಕ ಪ್ರದರ್ಶನವನ್ನು ಗುರುವಾರ ವಿಶ್ವನಾಥ ಕತ್ತಿ ದಂತ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಸ್ಥೆಯ ಪ್ರಾಂಶುಪಾಲ ಡಾ. ಅಲ್ಕಾ ಕಾಳೆ ಅವರು ಉದ್ಘಾಟಿಸಿದರು.

ಬಳಿಕ ಮಾತನಾಡಿದ ಅವರು, ಎಲ್ಲರೂ ಉಜ್ವಲ ಭವಿಷ್ಯಕ್ಕಾಗಿ ಉತ್ತಮ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಓದುವ ಹವ್ಯಾಸ ಬೆಳೆಸಿಕೊಳ್ಳಬೇಕು. ಶೈಕ್ಷಣಿಕ ಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆಗೆ ಇತರೆ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಓದಬೇಕು ಎಂದರು.

ಪ್ರಾಚಾರ್ಯ ಡಾ.ಬಿ. ಶ್ರೀನಿವಾಸ ಮಾತನಾಡಿ, ಎಲ್ಲ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಉತ್ತಮ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಓದುವ ಮೂಲಕ ತಮ್ಮ ಅಮೂಲ್ಯ ಸಮಯವನ್ನು ಗ್ರಂಥಾಲಯದಲ್ಲಿ ಕಳೆಯಬೇಕು ಎಂದರು. ಉಪಪ್ರಾಚಾರ್ಯ ಡಾ. ಪಿ.ಜಿ. ಜಾಡರ, ಡಾ. ಪ್ರಸನ್ನ ಸವನೂರ, ಗ್ರಂಥಪಾಲಕ ಶಶಿಕಾಂತ ಪಾಟೀಲ, ಡಾ. ಸಂಜೀವ ಟೋಣಿ, ಡಾ. ಮಹಾಂತೇಶ ರಾಮಣ್ಣವರ ಮತ್ತಿತರರು ಉಪಸ್ಥಿತರಿದ್ದರು.



ಬೆಳಗಾವಿಯ ಬಿ.ಎಂ. ಕಂಕಣವಾಡಿ ಆಯುರ್ವೇದ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯದಲ್ಲಿ ಹಮ್ಮಿಕೊಂಡಿರುವ ಎರಡು ದಿನಗಳ ಪುಸ್ತಕ ಪ್ರದರ್ಶನವನ್ನು ಪ್ರಾಂಶುಪಾಲ ಡಾ. ಅಲ್ಕಾ ಕಾಳೆ ಉದ್ಘಾಟಿಸಿದರು.

5A
ನಂ. 1 ಕನ್ನಡ ದಿನಪತ್ರಿಕೆ
ವಿಜಯವಾಣಿ
VIJAYAVANI » BELAGAVI
ಶುಕ್ರವಾರ 22 ನವೆಂಬರ್ 2019

# ಓದುವ ಹವ್ಯಾಸ ಬೆಳೆಸಿಕೊಳ್ಳಿ

**ಬೆಳಗಾವಿ:** ಇಂಟರ್‌ನೆಟ್‌ಗೆ ಅಂಟಿಕೊಳ್ಳದೆ ಪುಸ್ತಕ ಓದುವ ಹವ್ಯಾಸ ಬೆಳೆಸಿಕೊಳ್ಳಬೇಕು ಎಂದು ಕೆಎಲ್‌ಇ ವಿಶ್ವನಾಥ ಕತ್ತಿ ದಂತ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಸ್ಥೆಗಳ ಪ್ರಾಚಾರ್ಯೆ ಡಾ. ಅಲ್ಕಾ ಕಾಳೆ ಸಲಹೆ ನೀಡಿದ್ದಾರೆ.

ನಗರದ ಕೆಎಲ್‌ಇ ವಿಶ್ವವಿದ್ಯಾಲಯದ ಬಿ.ಎಂ. ಕಂಕನವಾಡಿ ಆಯುರ್ವೇದ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯದಲ್ಲಿ ಕೇಂದ್ರ ಗ್ರಂಥಾಲಯ ಮತ್ತು ಎನ್‌ಎಸ್‌ಎಸ್ ಘಟಕ ಜಂಟಿಯಾಗಿ ಆಯೋಜಿಸಿದ್ದ ಪುಸ್ತಕ ಪ್ರದರ್ಶನ ಉದ್ಘಾಟಿಸಿ ಮಾತನಾಡಿ, ಉತ್ತಮ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಓದುವ ಅಭಿರುಚಿ ಬೆಳೆಸಿಕೊಂಡು ಜೀವನ ಉಜ್ವಲಗೊಳಿಸಿಕೊಳ್ಳಬೇಕು ಎಂದರು. ಅಧ್ಯಕ್ಷತೆ ವಹಿಸಿದ್ದ ಆಯುರ್ವೇದ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯದ ಪ್ರಾಚಾರ್ಯ ಡಾ. ಬಿ.ಶ್ರೀನಿವಾಸ ಪ್ರಸಾದ ಮಾತನಾಡಿ, ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ತಮ್ಮ ಅಮೂಲ್ಯ ಸಮಯ ಗ್ರಂಥಾಲಯಗಳಲ್ಲಿ ವ್ಯಯಿಸಿ ಜ್ಞಾನ ವೃದ್ಧಿಸಿಕೊಳ್ಳಬೇಕು ಎಂದರು.



ಬೆಳಗಾವಿ ಕೆಎಲ್‌ಇ ವಿಶ್ವವಿದ್ಯಾಲಯದ ಬಿ.ಎಂ. ಕಂಕನವಾಡಿ ಆಯುರ್ವೇದ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯದಲ್ಲಿ ಆಯೋಜಿಸಿದ್ದ ಪುಸ್ತಕ ಪ್ರದರ್ಶನ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಪ್ರಾಚಾರ್ಯೆ ಡಾ. ಅಲ್ಕಾ ಕಾಳೆ ಉದ್ಘಾಟಿಸಿದರು. ಡಾ. ಬಿ.ಶ್ರೀನಿವಾಸ ಪ್ರಸಾದ ಇದ್ದರು.

DECCAN HERALD
Thursday
November 28, 2019

# 'Vama Sansadhana Yantra' wins national award

BELAGAVI, DHNS

The 'Vama Sansadhana Yantra' developed by the students of KLE Dr M S Sheshgiri College of Engineering & Technology (MSSCET) Electronics & Communication Department in collaboration with KAHER's B M Kankanwadi Ayurvedic Mahavidyalaya (BMKAM), has won a national award comprising cash prize of Rs 25 lakh.

Dr MSSCET Principal Basavaraj Katageri and BMKAM Principal B S Prasad informed reporters here on Tuesday that Texas Instruments in collaboration with Department of Science & Technology (DST) had announced the India Innovation Challenge Design Contest-2018 anchored by N S Raghavan Center for Entrepreneurial Learning (NSRCEL), Indian Institute of Management, Bengaluru (IIMB) and supported by MyGov. In the contest, students Swathi Pai, Priya Shirahatti, Chetan Patange and Santosh Hiremath guided by mentors Rajashri Khanai and Sheela Kore from Engineering section and Anil Koralli from Ayurvedic section emerged winners.

Vamana Karma is an Ayurvedic process (a Pradhana karma of Panchakarma) in which a patient undergoes induced vomiting to mainly treat Khaphaja disorders. The students have developed a solution which analyzes the contents of the vomitus. They have also developed engineered sinks and table that would help in keeping the patients comfortable throughout the process, they said.

The competition witnessed participation of 26,511 students from 1,760 engineering colleges from across India.

सकाळ गुरुवार, २८ नोव्हेंबर २०१९ ८



बेळगाव : सुवर्णपदक विजेती नव्या प्रभू हिच्यासमवेत प्राचार्य डॉ. बी. एस. प्रसाद व इतर.

## योगपटू नव्या प्रभू हिला सुवर्णपदक

**बेळगाव :** बी. एम. कंकणवाडी आयुर्वेदिक महाविद्यालयाची योगपटू नव्या प्रभू हिने सुवर्णपदक पटकाविले. बंगळूरमधील मल्लेश्वरम येथे कर्नाटक योग संघटनेतर्फे घेण्यात आलेल्या ३९ व्या राज्यस्तरीय योग स्पर्धेत २० ते ३० वयोगटातील महिलांच्या गटात नव्याने सुवर्णपदक पटकाविले. आता तिची राष्ट्रीय योग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी. एस. प्रसाद यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत २८ नोव्हेंबर २०१९

## योग प्रशिक्षिका नव्या प्रभू राज्यस्तरीय योग स्पर्धेत विजेते



बेळगाव : विजेत्या विद्यार्थिनीसह शिक्षकवर्ग.

प्रतिनिधी
बेळगाव

शहापूर येथील बी. एम. कंकणवाडी आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या योग प्रशिक्षिका नव्या एम. प्रभू यांनी २० ते ३० महिला वयोगटात ३९ व्या राज्यस्तरीय योग स्पर्धेत चॅम्पियनशीप मिळविली आहे. सदर स्पर्धा कर्नाटक असोसिएशन, मल्लेश्वरम यांच्यातर्फे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नव्या यांनी प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाचे उंचाविले आहे.

त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. प्रसाद, महाविद्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत २८ नोव्हेंबर २०१९

## केएलई आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये आज मोफत तपासणी शिबिर

**बेळगाव** : केएलई आयुर्वेद हॉस्पिटल, शहापूर येथे दि. २८ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ यावेळेत मूत्रपिंडाशी संबंधित विकारांची मोफत तपासणी करण्यात येणार आहे. बेळगावचे प्रख्यात किडणीतज्ज्ञ रुग्णांची तपासणी करतील. गरजूंनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

ಪ್ರಜಾವಾಣಿ
ಶನಿವಾರ, ನವೆಂಬರ್ 30, 2019

## ಯೋಗ ಸ್ಪರ್ಧೆ; ನವ್ಯಾ ಪ್ರಥಮ



ಬೆಳಗಾವಿ: ಕರ್ನಾಟಕ ಯೋಗ ಅಸೋಸಿಯೇಷನ್ ಏರ್ಪಡಿಸಿದ್ದ 39ನೇ ರಾಜ್ಯ ಮಟ್ಟದ ಯೋಗಾಸನ ಸ್ಪರ್ಧೆಯ ಮಹಿಳಾ ವಿಭಾಗದಲ್ಲಿ ಬೆಳಗಾವಿಯ ಕೆಎಲ್‌ಇ ಅಕಾಡೆಮಿ ಆಫ್ ಹೈಯರ್ ಎಜ್ಯುಕೇಷನ್‌ನ ಬಿ.ಎಂ. ಕಂಕಣವಾಡಿ ಆಯುರ್ವೇದ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯದ ವಿದ್ಯಾರ್ಥಿನಿ ನವ್ಯಾ ಪ್ರಭು ಪ್ರಥಮ ಸ್ಥಾನ ಪಡೆದಿದ್ದಾರೆ.

सकाळ
शनिवार, ३० नोव्हेंबर २०१९

## त्वचारोग तपासणी शिबिर आज

**बेळगाव :** केएलई आयुर्वेद हॉस्पिटल, शहापूरतर्फे शनिवारी (ता. ३०) त्वचारोग तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. सकाळी ९ ते दुपारी १ व दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत हे शिबिर होईल. शिबिरात सोरिॲसिस, पांढरे डाग, चट्टे पडणे, खाज, ॲलर्जी यांसारख्या विकारांवर तपासणी करण्यात येणार आहे, असे आयोजकांतर्फे कळविले आहे.

## केएलई आयुर्वेदतर्फे उद्या शिबिर

**बेळगाव** : केएलई आयुर्वेद हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरतर्फे दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १ व दुपारी ३ ते ५ यावेळेत श्वसनाशी संबंधित विकारांची तपासणी करण्यात येणार आहे.

दि. ५ रोजी सकाळी ९ ते १ व दुपारी ३ ते ५ यावेळेत कॅन्सर तपासणी तसेच ९ ते १ यावेळेत किडनी विकारांची तपासणी करण्यात येणार आहे. इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

तरुण भारत ११
रविवार १ डिसेंबर २०१९